संदर्भ :- आयुक्त औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक १९८८/म.शा.का-२ आरईव्ही-२०, दिनांक १७.१.१९८९.

(47)

क्रं.८८/आरबी/दोन/एलएनडी/१/९६०
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड,
दिनांक :- १० एप्रिल १९८९.

## आदेश

श्री. सखाहारी इश्वरराव काळे, अव्वल कारकून, भारत भाऊराव सोळंके, लिपीक व विनायक विठ्ठलराव वाघ, स्टेनो जिल्हाधिकारी कार्यालय, बीड या कर्मचा-यांनी राहाणेसाठी बीड येथील स.नं. ३४ तरफ माळी मधील मंजूर भू-अभिन्यासातील भुखंड क्रमांक अनुक्रमे ३, २ व ४ ची मागणी केली, त्याप्रमाणे वरील कर्मचा-यांची मागणी मंजूर करण्यांत आली, व या कर्मचा-यांना भुखंड क्रमांक ३, २ व ४ राहाणेसाठी भोगाधिकार किंमतीवर महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे] नियम १९७१ मधील नियम २८ प्रमाणे विना लिलाव प्रदान करण्याची शिफारस आयुक्त, औरंगाबाद यांना केली.

२. आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांचे संदर्भीय पत्राद्वारे सर्वे नंबर ३४ तरफ माळी, बीडचे मंजूर भू अभिन्यासातील भुखंड खालील परीशिष्टात दर्शविलेल्या तपशिलानुसार वरील शासकीय कर्मचा-यांना प्रदान करण्यास मान्यता दिली.

| अ.नं. | शासकीय कर्मचा-याचे नांव | प्रदान करावयाचा भुखंड | प्रदान करावयाचा भुखंडाचे क्षेत्र. | नियम २६[३]नुसार भुखंडाचे भोगाधिकार किंमत. |
|---|---|---|---|---|
| १] | श्री.सखाहारी इश्वरराव काळे, अ.का. | ३ | २०० चौ.मी. | १९,२००/- |
| २] | श्री.भारत भाऊराव साळुंके, लिपीक, | २ | १७६ चौ.मी. | १६,८९६/- |
| ३] | श्री. विनायक विठ्ठलराव वाघ, स्टेनो. | ४ | १८० चौ.मी. | १७,२८०/- |

आयुक्त, औरंगाबाद यांचे सुचनेप्रमाणे सदरी कर्मचा-यांनी खालीलप्रमाणे सदरी भुखंडाची भोगाधिकार किंमत खालील तपसिलाप्रमाणे चलनने जमा केलेली आहे.

..२..

| | भरलेली रक्कम | दिनांक |
|---|---|---|
| सखाहारी इश्वरराव काळे, अ.का., | १९; २००/- | १०. ३. ८९ |
| भारत भाऊराव साळुंके, लिपीक | १६,८९६/- | १०. ३. ८९ |
| विनायक विठ्ठलराव वाघ, | १७, २८०/- | १४. ३. ८९ |

महाराष्ट्र जमीन महसुल [सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे] नियम १९७१ चे नियम २८ प्रमाणे मी श्री. के. पी. बक्शी, जिल्हाधिकारी, बीड श्री. सखाहारी इश्वरराव काळे, अ.का. यांना भुखंड क्रमांक ३, भारत भाऊराव साळुंके, लिपीक यांना भुखंड क्रमांक २ व श्री. विनायक विठ्ठलराव वाघ, स्टेनो यांना भुखंड क्रमांक ४ सर्वे नंबर ३४, तरफ माळी बीड राहाणेसाठी खालील अटींवर देण्याचे आदेशित करतो.

[१] प्रस्तावित जमीन ज्या कामाकरिता देण्यात आली, त्याच कामाकरिता उपयोगात आणावयास पाहिजे, अन्य कोणत्याही कामाकरिता उपयोगात आणली जाऊ नये.

[२] प्रस्तावित जमीन जिल्हाधिकारी यांचे पूर्वपरवानगीशिवाय विक्री, गहाण, दान अथवा अन्य मार्गाने हस्तांतरित करता येणार नाही.

[३] अर्जदारांनी जमिनीचा ताबा मिळालेपासून ६ महिन्याचे आत बांधकामाची परवानगीकरिता संबंधित नगर परिषदेकडे अर्ज करावा, नगर परिषदेने जर नकार दिला आणि अपीलात जर त्यास पुष्टी मिळाली तर ही देणगी रदद करण्यांत येईल.

[४] बांधकामाची परवानगी मिळालेपासून ३ वर्षात बांधकाम पूर्ण करावे. या मुदतीत वाढ हवी असल्यास तशी जिल्हाधिकारी यांची मंजुरी घ्यावी.

[५] अर्जदारास जमिनीचा ताबा मिळालेपासून अकृषि धारा दयावा लागेल.

[६] वरील अटींचे भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास ही देणगी रदद करण्यांत येईल.

[७] वरील अटी मान्य असल्याबाबत व तसेच नमुना नंबर १३ वर करारनामा करून दयावा लागेल.

स्वाक्षरीत/-

[ के. पी. बक्शी ]

जिल्हाधिकारी, बीड.

प्रतिलिपी-

१] उपविभागीय अधिकारी, बीड.

२] तहसीलदार, बीड यांना देऊन आदेश की, संबंधिताचे ताब्यात -

...३..

(51)



वेगवेगळा पंचनामा करुन भुखंड दयावा. जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, बीड यांचे मोजणीचे नकाशेनुसार हद्दी कायम करुन देऊन त्याच्या चतु:सिमा पंचनाम्यात दर्शवावी.

[३] जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, बीड यांना मंजूर अभिन्यासाचे नकाशासह देऊन कळविण्यांत येते की, भूखंड क्रमांक १ ते ५ ची मोजणी करुन मोजणी नकाशाची एक प्रत तहसीलदार, बीड व या कार्यालयास तात्काळ पाठवावी.

[४] श्री. सखाहारी इश्वरराव काळे, अव्वल कारकून.

[५] श्री. भारत भाऊराव साळुंके, लिपीक.

[६] श्री. विनायक विठ्ठलराव वाघ, स्टेनो, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना माहितीस्तव.

जिल्हाधिकारी बीड करितां.